# जिल्ह्यात २७ हजार ४१३ व्यक्तींना घरकुलाचा लाभ

## पालकमंत्र्याच्या हस्ते शनिवारी मंजुरीपत्रांचे वितरण

**अकोला :** प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या दुस-या टप्प्यात जिल्ह्यातील २७ हजार ४१३ लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळणार आहे.

पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेत प्रातिनिधीक स्वरूपात 'गृहोत्सव'- मंजुरीपत्र वाटपाचा कार्यक्रम उद्या, दि. २२ फेब्रुवारी दु. ३.३० वा. सिव्हील लाईन येथील जि. प. संविधान सभागृहात होणार आहे. केंद्रीय



गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत राज्यातील २० लाख लाभार्थ्यांना मंजुरीपत्र वितरण, १० लाख व्यक्तींना पहिला हप्ता वितरण राज्यस्तरीय कार्यक्रमात होईल. त्याचे प्रक्षेपण जिल्हास्तरीय कार्यक्रमात केले जाणार आहे. तालुका स्तरावर पंचायत समिती सभागृहात आमदार व लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत, तसेच ग्रामपंचायत स्तरावर सरपंच यांच्या अध्यक्षतेत मंजुरीपत्र वितरण कार्यक्रम होणार असून, राज्यस्तरीय कार्यक्रमाचे प्रक्षेपणही केले जाणार आहे. लाभार्थी व अधिकाधिक नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी यांनी केले आहे.

# अकोल्यात सोमवारी २६२ पदांसाठी रोजगार मेळावा

**▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):**
जिल्ह्यातील उमेदवारांना खासगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून जिल्हा कौशल्य विकास व रोजगार केंद्रातर्फे अकोला इंडस्ट्रीज असोसिएशनच्या सहकार्याने पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा दि. २४फेब्रुवारी रोजी होणार आहे. मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांतील १७० पदे भरली जाण्याबरोबरच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत ९२ पदांसाठी इंटर्नशीपची संधीही मिळणार आहे. औद्योगिक वसाहतीत अप्पू पुतळा परिसरातील अकोला इंडस्ट्रीज असोसिएशनच्या सभागृहात हा मेळावा सकाळी ११ ते दु. २ या वेळेत होईल.

टारगेट सेक्युरिटी कंपनीत सुरक्षा कर्मचा-याची १५ (शैक्षणिक पात्रता किमान १२ वी उत्तीर्ण, वयोमर्यादा २१ ते ४५ वर्ष), भारतीय जीवन विमा निगममध्ये विमा




सखींची ३० (वयोगट २५ ते ६५, शैक्षणीक पात्रता १२ वी), पिपल ट्री ऑनलाईनमध्ये केअरटेकरची २० पदे (वय २१ ते २९, पात्रता एनएनएम, जीएनएम), तसेच मशिन ऑपरेटरची २० पदे (वय १८ ते ३०, किमान १२ उत्तीर्ण) भरली जातील. छ. संभाजीनगर येथील नवभारत फर्टिलायझर्समध्ये क्षेत्रीय अधिका-याची ३५ पदे (वयोमर्यादा १८ ते २८, दहावी, बारावी किंवा पदवीधर), तसेच कृषी अधिका-याची १५ पदे (वय २१ ते २१ ते ३५, कृषी पदविका किंवा पदवी) भरली जातील. ब्ल्यू डार्ट कुरिअर सर्व्हिसमध्ये डिलिव्हरी बॉयची १० पदे (वय १८ ते ३०, किमान १२ वी), तर बॅक ऑफिस मदतनीस (वय १८ ते ३०, पदवी, संगणक ज्ञान) अशी २० पदे भरली जातील.

पुण्याच्या जॉन डिरे कंपनीत प्रशिक्षणार्थ्यांची २० पदे (वयोमर्यादा १८ ते २४, मेकॅनिकल, ऑटोमोबाईल, प्रॉडक्शन, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स यापैकी कुठलीही पदविका) भरली जाणार आहेत. मेळाव्यात www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट देऊन लॉगइन आय डी व पासवर्डचा वापर करुन सहभाग नोंदवता येईल. त्याचप्रमाणे, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत १८ ते ३५ वयोगटातील ९२ उमेदवारांना (एएमएम, जीएमएम, बारावी, पदविका, आयटीआय, पदवीधर अशा विविध अर्हता) ओझोन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, आयकॉन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, वॉसटॉक इंडस्ट्रीज, गुजराज अंबुजा एक्स्पोर्ट लि., साईराज ॲग्रो इंडस्ट्रीज, प्राजक्ता ॲग्रो मशिनरी, गोदावरी लाईफ सायन्स आदी कंपन्यांत प्रशिक्षणाची संधी उपलब्ध आहे. महास्वयम संकेतस्थळाला भेट देऊन आपल्या इंटर्न लॉगिनमधून सहभाग नोंदवता येईल. इच्छूकांनी २४ फेब्रुवारी रोजी शैक्षणिक कागदपत्रे, बायोडेटा व छायाचित्रांसह अकोला इंडस्ट्रीज असोसिएशनच्या सभागृहात स्वखर्चाने उपस्थित राहून संधीचा लाभ घ्यावा. काही अडचण आल्यास (०७२४) २४३३८४९ किंवा ८९८३४१९७९९ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी केले.

# प्रहार अपंग क्रांतीचा महापालिकेवर मुर्दा मोर्चा

**▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):**
प्रहार अंपग क्रांती संस्थेच्या वतीने दिव्यांगाच्या विविध मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी गुरुवारी दि. २० फेब्रुवारी रोजी महापालिकेवर मुर्दा मोर्चा काढण्यात आला. यावेळी दिव्यागांनी केली. घोषणाबाजीही रेल्वे स्थानक, बसस्थानक या ठिकाणी दिव्यांग भवनाची निर्मिती करण्यात यावी. जेणे करुन बाहेरगावावरुन आलेल्या दिव्यांगाना निवास करणे सोयीचे जाईल. दिव्यांग बांधवांना हक्काचे घरकुल देण्यात यावे. दिव्यांगाना रोजगार मिळावा, या अनुषंगाने महापालिका क्षेत्रात जागा उपलब्ध करुन द्यावी, जेणेकरुन दिव्यांगाना रोजगार उपलब्ध होईल. दिव्यांग



खेळाडूंना प्रोत्साहनपर वार्षिक पेन्शन सुरु करावी, दिव्यागांना महापालिकेतील रंगाचे काम, भंगार, रद्दीचा ठेका, रस्ता, नाल्याचे ठेके देण्यात यावेत आदी विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी महापालिकेत मूर्दा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात शेकडो दिव्यांग बंधु भगिनी सहभागी झाल्या होत्या.

## बाल हक्क संरक्षण आयोगातर्फे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांना पुरस्कार

**▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):**
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाद्वारे 'बालस्नेही पुरस्कार-२०२४'अंतर्गत उत्कृष्ट जिल्हाधिकारी पुरस्कारासाठी अमरावती विभागातून अकोल्याचे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांची निवड झाली आहे. आयोगाच्या अध्यक्ष ॲड. सुशीबेन शाह यांनी ही निवड जाहीर केली.



मुंबईत यशवंतराव चव्हाण सेंटर येथे दि. ३ मार्च रोजी कार्यक्रमात जिल्हाधिका-यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, गृह राज्यमंत्री योगेश कदम, महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर आदी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित राहतील. जिल्ह्यात बाल हक्क सप्ताह निमित्त अनेक उपक्रम राबविण्यात आले. महिला व बालविकास भवन, वन स्टॉप सेंटरसाठी जागा मिळविणे, १०९८ स्टीकर्सवाटप, महिला राज्यगृहातील २ अनाथ विद्यार्थिनींना अभय केंद्रात कंत्राटी नोकरी, बालगृहातील बालकांना आवश्यक सुविधांची पूर्तता, बाल हक्क व मतदार जनजागृती तसेच बालविवाहाला प्रतिबंधासाठी सर्वकष प्रयत्न करण्यात आले.

# क्रिकेटच्या रोमांचक सामन्यात अकोला जिल्हा परिषद संघ ठरला विजेता

**▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):**
जिल्हा परिषद अधिकारी-कर्मचारी खेळ क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम अमरावती विभागीय स्पर्धा सन २०२५ क्रिकेटचे विजेतेपद जिल्हा परिषद अकोला ने पटकावले तर बुलढाणा जिल्हा परिषद उप विजेता ठरला. बुलढाणा नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना अकोला संघाला ९९ धावांचा विशाल लक्ष दिला.अकोला जिल्हा परिषद संघाने बुलढाणा जिल्हा परिषद संघावर ६ गडी राखून विजय मिळवत स्पर्धेच्या विजेतेपद मिळवले.अकोला क्रिकेट क्लब अकोला या मैदानावर खेडल्या गेलेल्या अंतिम सामन्यात अकोला जिल्हा परिषद संघाचे कर्णधार मुंतजिर शाह यांनी १५ चेंडूत २५ धावा, मो.झाहेद १९ चेंडूत ३३ , सलमान वकार १० चेंडूत १९, तौसिफ खान ७ चेंडूत ६ तर अष्टपैलू खेडाळू विठ्ठल कवळकारने ७ चेंडूत १८ धावा केले.अकोला संघाकडून गोलंदाजी करताना अयाज खानने २ गडी बाद केले , विठ्ठल कवळकारने १ तर सचिन गीतेने १ गडी बाद केला.स्पर्धेत सवीत्तम



फलंदाज कर्णधार मुंताजिर शाह, सर्वोत्तम गोलंदाज विठ्ठल कवळकार तर मालिकाविराचा पुरस्कार अयाज खान यांनी मिळवला. अकोला संघ कर्णधार मुंताजिर शहा यांच्या नेतृत्वात , उपकर्णधार विठ्ठल कवळकर , अयाज खान, तौसिफ खान, मोहम्मद झाहेद , सलमान वकार, सचिन गीते, महेश कुलट, गिरीश चाटे, धीरज यादव, उत्कर्ष टाले, सक्षम गावंडे, राम मुंढे, यश मनेकर व चेतन टीकार यांचा समावेश होता.

# तीन हजार रुपयेची लाच घेताना पोलीस शिपाई अडकला ACB च्या जाळ्यात

**▪अकोला,दि.२१ (प्रतिनिधी):**
अँटी करप्शन ब्युरो, अमरावती पथकाने आज मोठी कारवाई करीत पातूर पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस शिपाई पवन सुनील भाकरे (वय ३६ वर्षे, पद पोलीस शिपाई (वर्ग-३), पो.स्टे. पातुर जि. अकोला. रा. वसंत नगर मानोरा ता. मानोरा जि. वाशिम) यास तीन हजार रूपयेची लाच घेताना रंगेहाथ पकडले. थोडक्यात हकिगत अशी की, या प्रकरणातील तक्रारदार यांच्या विरूध्द पातुर पोलीस ठाण्यात यापुर्वी देशी दारू विक्रीचे गुन्हे दाखल आहेत. तक्रारदार यांनी सध्या दारू विकीचा धंदा बंद केला असुन, सध्या मोलमजुरी करीत आहे. मात्र आरोपीने तक्रारदार यांना मागील गुन्हयाच्या अभिलेखावरून तडीपारीची कारवाई न करण्याकरीता पाच हजार रूपये लाचेची मागणी केली. यामुळे तक्रारदार यांनी २० फेब्रुवारीला ला.प्र.वि. अकोला येथे तक्रार दिली होती.

या तक्रारीवरुन २० फेब्रुवारी रोजी कारवाई दरम्यान आरोपी भाकरे याने पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी पाच हजार रूपये मागणी करून तडजोडीअंती तीन हजार रुपये लाच रक्कमेची मागणी करून स्विकारण्याची समंती दर्शविली.तर २१ फेब्रुवारी २०२५ रोजी पंचासमक्ष आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक पवन सुनिल भाकरे याने तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम तीन हजार रुपये पंचासमक्ष स्विकारली. यावरुन आज रोजी आरोपी लोकसेवक यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आलेले असुन पो.स्टे. पातुर, अकोला येथे गुन्हा नोंद करण्याची प्रकिया सुरु आहे.सदरची कार्यवाही मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, अन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मिलिंदकुमार बहाकर, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि., अकोला, यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पो.नि. भारत जाधव यांच्यासह दिगांबर जाधव, उपेंद्र थोरात, संदिप ताले, किशोर पवार, चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.

# अडगाव ते राहेर मुख्य रस्त्यावर महसूल विभागाची धडक कारवाई

## १ लाख १५, ९६० रुपये दंड वसूल

**▪पातुर,दि.२१ (प्रतिनिधी):**
तालुक्यात अवैध मुरूम वाहतूक करणाऱ्यांविरोधात महसूल विभागाने पातुर चे तहसीलदार डॉ. राहुल वानखडे यांचे मार्ग दर्शनामध्ये कडक कारवाई केली आहे. अडगाव ते राहेर मुख्य रस्त्यावर अवैध मुरूम वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती नायब तहसीलदार बळीराम चव्हाण यांना मिळाल्यानंतर महसूल पथकाने रविवारी, १६ फेब्रुवारी २०२५ रोजी कारवाई करत



एक ट्रॅक्टर ताब्यात घेतले.सदर ट्रॅक्टरवरील चालकाकडे मुरूम वाहतुकीसाठी आवश्यक असलेल्या रॉयल्टीबाबत चौकशी करण्यात आली. मात्र, चालकाने समाधानकारक उत्तर देण्याऐवजी उडवा उडवीची उत्तरे दिली.

त्यामुळे महसूल विभागाने तात्काळ कडक पावले उचलत ट्रॅक्टर ताब्यात घेतले आणि अधिकृत कारवाईसाठी जाणे पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले.१,१५,९६० रुपयांचा दंड आकारलातपासणी दरम्यान, सदर मुरूम वाहतूक परवानगीशिवाय आणि कोणत्याही अधिकृत दस्तऐवजाशिवाय केली जात असल्याचे स्पष्ट झाले.

यामुळे महसूल विभागाने अवैध वाहतुकीवर कडक कारवाई करत ट्रॅक्टर मालक आणि संबंधित व्यक्तीवर १,१५,९६० रुपयांचा दंड ठोठावला. महसूल विभागाने तातडीने ही रक्कम वसूल केली. महसूल विभागाच्या या धडक कारवाईमुळे अवैध मुरूम वाहतूक करणाऱ्या व्यक्तींमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. अवैध उत्खनन आणि वाहतुकीस आळा घालण्यासाठी प्रशासनाने भविष्यात अशा कारवाया अधिक तीव्र करणार असल्याचे संकेत दिले आहेत.

या कारवाईमुळे महसूल प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत असून, अवैध उत्खनन आणि त्यातून होणाऱ्या महसुलाच्या नुकसानीला आळा घालण्याच्या दृष्टीने हा मोठा निर्णय ठरला आहे. यामुळे नायब महसूल तहसीलदार बळीराम चव्हाण यांचे कौतुक करण्यात आले आहे.

## अनियंत्रीत झालेली कार पेटून दोघांचा जागीच मृत्यू

**अकोला :** मलकापूरहून अकोल्याकडे येत असलेली हंडाई आयटेन कार पलटी होवून पेटल्याची घटना समृध्दी महामार्गावर दुसऱ्या टोल नाक्याजवळ मलकापूर हद्दीत घडली आहे.सदर कार ही सी. एन. जी. गॅसवर चालणारी होती. चालकाचे नियंत्रण सुटून बेकाबु झालेली कार महामार्गावर रस्त्याच्या कडेला सुरक्षेसाठी लावलेल्या बॅरीकेटला धडक देवून पलटी झाली व त्यानंतर स्फोट होवून या कारने पेट घेतला.

# शिव गौरा विवाहासाठी मातृशक्ती समूह गठीत



**▪अकोला,दि.२१ (प्रतिनिधी):**
राज राजेश्वर नगरीत महाशिवरात्री दिनी प्रथमच तीन दिवसीय भव्य शिव गौरा विवाह महोत्सव होत असून याची तयारी शिव गौरा विवाह महोत्सव समितीच्या वतीने सुरू आहे. काशीच्या धर्तीवर हा भव्य झाकीयुक्त शिव पार्वती विवाह दिनांक २५ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी पर्यत होणार आहे.या संदर्भात शुक्रवारी स्थानीय टिळक रोड परिसरातील मोठ्या राम मंदिरात मातृशक्तीची आयोजन सभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली.यात बहुसंख्य मातृशक्तीनी आपली उपस्थिती दर्शवित या भव्य दिव्य आयोजन संदर्भात अनेक प्रस्ताव व रूपरेषा मांडली. या आयोजन संदर्भात मातृशक्तीची विवाह आयोजन उपसमिती गठीत करण्यात येत असून महिलांनी यात सक्रियपणे सहभागी होऊन महानगरात प्रथमच होत असणाऱ्या या भव्य महाविवाह सोहळ्यात हातभार लावण्याचे आवाहन करण्यात आले. या शिव गौरा विवाह महोत्सवाचा प्रारंभ मंगळवार दिनांक २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५-३० वाजता राज राजेश्वर मंदिरात गणेश पूजन कार्यक्रमाने होऊन सायंकाळी ६-३० वाजता हळदी, मेहंदी,भजन संध्या कार्यक्रम होणार आहे. सर्व माता भगिनींना या कार्यक्रमात मेहंदी लावण्याची व्यवस्था समितीच्या वतीने करण्यात येणार आहे.दि २६ फेब्रुवारीच्या महाशिवरात्री दिनी दुपारी ४-३० वाजता राजेश्वर मंदिरापासून शिवविवाहाची भव्य महावरात रिझर्व माता मंदिर प्रांगणापर्यंत काढण्यात येणार आहे. या शिव वरातीत वीरभद्र, नंदी, शिवगण व विविध शिव देखावे झाकी रुपाने सहभागी होणार आहेत. ही शोभायात्रा मुख्य मार्गावरून रिझर्व माता मंदिर येथे पोहोचून या ठिकाणी रात्री ८-३० वाजता भव्य शिवपार्वती महाविवाह होणार आहे. गुरुवार दिनांक २७ फेब्रुवारी रोजी रिझर्व माता मंदिर प्रांगणात या शिव गौरा विवाहाचा समारोप भव्य महाप्रसादाने होणार आहे.या भव्य आयोजनात सहभागी होण्यासाठी महिला पुरुष भक्तांनी शिव गौरा विवाह महोत्सव समिती कार्यालय खोलेश्वर येथे संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले.यावेळी समितीचे सेवाधारी व मातृशक्ती उपस्थित होती.

## थोडक्यात




### युवा कलाकारांना आपली कला सादर करण्याचे आयोजन

**अकोला :** युवा कलाकारांना आपली कला सादर करण्याकरिता अकोला जिल्ह्यातील ऐतिहासिक मुर्ख संमेलन असे धुळमातीच्या दिवशी दि. १४.२.२०२५ शुक्रवार स्वराज्य भवन परिसरात आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची रविवार रोजी कार्यकर्त्याची बैठक घेऊन पुढील रुपरेषा ठरविण्यात आली संस्थापक संयोजक स्व. रामकिशोर श्रीवास गुरुजी यांच्या कल्पनेतुन ५२ वर्षापूर्वी प्रभुदयाल शर्मामुर्खाधिराज यांच्या भुमीकेतुन व लक्ष्मणसिंग जाजोरीया व इतर मंडळी यांनी मुहुर्तभेट रोऊन कार्यक्रमाची सुरुवात केली आहे. आज ५३ वर्ष होत आहे. यावेळी कार्यक्रमाचे संयोजक म्हणुन रामकिशोर श्रीवास यांच्या सुन प्रा. डॉ.कोमल श्रीवास यांची एकमताने निवड करुन कार्यकारी संयोजक म्हणून सर्वेशचंद्र कटीयार याची नियुक्ती करण्यात आली.यावेळीजेष्ठ कार्यकर्ता डॉ. रामप्रकाश वर्मा, सर्वेशचंद्र कटीयार, योगेश इंगळे, समाधान खरात, विशाल शर्मा, शिवलाल माझोकर, शशिकांत मेहरे, एस.डी. सदाशिव, मनोज शाहु, भारत भानुदास वरटे, नितीन पवार, अविनाश तुपसय्यद,आदित्य राजेद्र श्रीवास, मोहीत ठाकुर इत्यादीच्या उपस्थितीमध्ये पार पडला असुन युवा कलाकारांना आपली कला सादरप करण्या करिता त्यांनी बाराज्योतीलिंग मंदिर रणपिसे नगर,९८२२०३७४२७ (स्वप्निल टेलर्स) यांचेकडे दि. २८.२.२०२५ पर्यत नावाची नोंदणी करावी ज्याची नोंदणी झाली.

# शहरातील रस्त्यावर प्रत्येक चौकात झेब्रा क्रॉसिंग आखावी

**▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):** शहरातील बहुतांशी चौकांमध्ये झेब्रा (नशलीर) पट्टे शोधूनही सापडत नाहीत. त्यामुळे चौक ओलांडून वाहनचालक पुढे थांबतात. शहर वाहतूक शाखेकडून महानगरपालिकेला चौकांमध्ये झेब्रा क्रॉसिंग पट्टे मारण्यासाठी पत्रव्यवहार केला आहे. परंतु महानगरपालिकेकडून कोणतीही दाद मिळत नसल्याने अखेर वाहतूक पोलिसांनी झेब्रा क्रॉसिंगच्या दंडात्मक कारवाया करणेच बंद केले आहे. शहरातील मार्गावरील सिग्नल व चौकांमध्ये झेब्रा पट्टे दिसेनासे झालेले आहेत. तर शहरातील प्रमुख चौकांमध्येही झेब्रा पट्टे नसल्याने त्या ठिकाणी वाहनचालक बेशिस्तीने सिग्नल ओलांडून थांबतात. त्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. व वाहतूक कोंडी पण होत आहे. बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई करताना पोलिसांशी वाहनचालक हुज्जत घालतात. मात्र झेब्रा पट्टे नसल्याने पोलिसांनाही माघार घ्यावी लागते. शहर वाहतूक शाखेकडून महानगरपालिकेला चौकांमध्ये झेब्रा क्रॉसिंग पट्टे मारण्यासाठी पत्रव्यवहार केला आहे. परंतु, अद्यापही महानगरपालिके कडून कारवाई होत



नसल्याने एकप्रकारे वाहतूक पोलिस शाखेच्या पत्रांना केराचीच टोपली दाखविली जाते की काय, अशी शंका यानिमित्ताने सामाजिक कार्यकर्ते उमेश इंगळे यांनी उपस्थित केली आहे शहरातील चौक वा सिग्नलच्या ठिकाणी झेब्रा क्रॉसिंग पट्टे हे पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी असतात. परंतु चौकांमध्ये झेब्रा क्रॉसिंगचे पट्टेच राहिलेले नाहीत.त्यामुळे अनेकदा वाहने खुपच पुढे येऊन थांबतात. त्या वेळी पादचाऱ्यांनाही मार्गक्रमण करताना वादावादीला सामोरे जावे लागते. 'बहुतांशी सिग्नल व चौकांमध्ये डोब्रा क्रॉसिंग पट्टे नाहीत. त्यामुळे पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना मोठी कसरत करावी लागते. चौकाचौकांजवळ आणि अंडरपासजवळ उड्डाणपुलावर रस्त्यावर क्रॉसिंग लोकांच्या सुरक्षिततेसाठी बनवले जातात. वाहन चालवणाऱ्या लोकांना त्यांचे वाहन कुठे थांबवायचे आणि रस्ता ओलांडणाऱ्यांना रस्ता ओलंडण्यासाठी सोप्प जावं यासाठी हे झेब्रा क्रॉसिंग असतं. अकोला शहरात चौका चौकात वाहतूक पोलिसांच्या पाठपुराव्याने सिग्नल सुरू झाले परंतु झेब्रा क्रॉसिंग कुठेच नाही. त्यामुळे वाहनचालक बेशिस्त वाहन चालवतात. --वाहनचालकही पोलिसांची हुज्जत घालतात, बेशिस्त वाहन चालकांना शिस्त लावण्यासाठी वाहतूक पोलिसांच्या नाकी नऊ आले आहे.शहरातील रस्त्यावर रस्ता सुरक्षा समिती च्या वतीने कोणत्याही प्रकारच्या सुविधा नाही. त्यामुळे अपघात घडत आहेत म्हणून रस्त्यावर आवश्यक असलेल्या प्रत्येक चौकासह उड्डाणपुलावर, अंडरपास जवळ शहरातिल प्रत्येक चौकात झेब्रा क्रॉसिंग, पांढरे व पिवळे पट्टे सोबतच स्टॉप लाईन आखावी.

# सहकारातच समृध्दीचा पाया : डॉ.संतोषकुमार कोरपे

## आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त संवाद यात्रा

**▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):**
सहकारातच समृध्दीचा पाया असून, शेतकऱ्यांनी आर्थिक सुबत्ता यायला पाहीजे १०० वर्षापूर्वी आपल्या पुर्वजांनी सहकाराची निर्मिती करून शेतीला गती देण्याचे काम केले. आता तर सहकारामध्ये केंद्र व राज्य सरकारची देखील रूची वाढली असून, सहकाराला नवा आयाम देण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. सहकाराचा आत्मा असलेल्या सेवा सहकारी सोसायट्यांच्या बळकटीकरणासाठी नवे धोरण आखले असून याअंतर्गत अनुदानरूपी साहीत्य देखील उपलब्ध करून देण्यात आले आहे. सेवा सहकारी सोसायट्यांच्या माध्यमातून शेतीच नव्हे तर जोड उद्योगाला चालना देत आपल्यात आर्थिक सुबत्ता आणता येईल असे प्रतिपादन दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे यांनी केले. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सेवा सहकारी सोसायट्यांच्या बळकटीकरणाच्या दिशेने राबवित असलेल्या उपक्रमा अंतर्गत ते सेवा सहकारी सोसायटी जवळा, डाबकी, दुधलम येथे बोलत होते. यावेळी दुधलम येथील सेवा सहकारी सोसायटीच्या नवीन इमारतीचे उद्घाटन डॉ. संतोषकुमार कोरपे यांचे शुभहस्ते करण्यात आले. यावेळी सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर महल्ले जवळा सोसायटीचे अध्यक्ष गजाननराव गावंडे, डाबकी सोसायटीचे अध्यक्ष प्रल्हादराव पडोळे, उपाध्यक्ष बाळासाहेब देशमुख,




तसेच निळकंठराव खेडकर, प्रभाकरराव राऊत मंचावर उपस्थीत होते.

डॉ.कोरपे म्हणाले सर्वांच्या सहकार्यातून साधलेला विकास निरंतर आणि तेवढाच परिपक्व असतो ही बाब आपल्या पुर्वजांनी हेरून सहकार वृत्ती जोपासली. त्यातुनच शेतीचा विकास साधत आले. यामध्ये सेवा सहकारी सोसायट्या हा महत्वाचा दुवा असून त्याचे बळकटीकरण करण्याची गरज आहे. केंद्र सरकारने देखील यासाठी नवेधोरण अंमलात आणले असून रू३.०० लाख किंमतीचे संगणक अनुदानावर देण्यात आले आहे. ही मोठी उपलब्धी असून, याव्दारे सोसायट्यातील कामकाजात सुसुत्रता येईल असे ते म्हणाले.

अनेक सोसायट्यांकडे आपली स्वतःची इमारत नाही तथापी आता नवीन इमारतीसाठी अल्पदरात कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे तर जिल्हा बँकेकडून रू१.०० लाख अनुदान देण्यात येत असून काही सोसायट्यांनी लाभ देखील घेतला आहे. याशिवाय शास्वत शेती उत्पादन वाढी करीता बँकेने अत्यल्प व्याजदरात जलसिंचन कर्ज उपलब्ध करून दिले आहे. शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा असे डॉ. कोरपे म्हणाले.सहकारातून समृध्दी आणण्यासाठी युवकांनी पुढे यावे सोसायट्यांच्या इमारती उभ्या करून तेथे केवळ शेतीच नव्हे तर अन्य जोडउद्योग सुरू केल्यास विकासाला चालना मिळेल. ह्यातुन गावाचा पर्यायाने जिल्ह्याचा विकास साधता येईल. यासाठी विलंब होवू शकतो परंतु अशक्य नाही. पुढील दोन ते तिन वर्षात सोसायट्याव्दारे विकासाचे मुर्तरूप साकारले जाईल असा विश्वासही डॉ. कोरपे यांनी व्यक्त केला.

अकोला-वाशिम जिल्ह्याच्या सहकाराला शतकोत्तर परंपरा आहे. आपल्या पूर्वजांनी परस्पर विश्वासावर सहकार अंगिकृत करत त्याला बळ देण्याचे काम केले. सेवा सहकारी सोसायटी हा सहकारातील मुख्य घटक समजून त्यांना सक्षम करण्याचे तसेच शेतीला जोड व्यवसाय व इतर व्यवसाय उभारून भरीव कार्य करण्याची गरज आहे. हा विश्वास पुर्वजापासून आजच्या नवयुवकापर्यंत चालत आला असून तो अधिक दृढ झाला पाहिजे. त्यास अनुसरूनच सेवा सोसायट्यांना बळकटी देवून सामुहीक विकास साधण्याचा आपला संकल्प असल्याचे प्रतिपादन बँकेचे नवनिर्वाचीत संचालक डॉ. जयराज कोरपे यांनी केले.सदर कार्यक्रमास सेवा सहकारी सोसायट्यांचे आजी माजी पदाधिकारी, सदस्य व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिल्लीतील 'आप' च्या अपयशाने 'आम आदमी' सत्तेतून बाहेर फेकला गेला?

जेष्ठ समाजसेवक अन्ना हजारे यांच्या ५ एप्रिल २०११ च्या 'जन लोकपाल विधेयक' आंदोलनाला दिल्ली स्थित 'इंडिया अगेंस्ट करप्शन' या सामाजिक संघटनेने पाठिंबा दिला होता. अण्णाच्या अन्न त्याग आंदोलनाला अनेक सामाजिक संघटनांनी पाठिंबा दिला. यात सामाजिक कार्यकर्ते व मॅगसेसे पुरस्कार विजेते अरविंद केजरीवाल, माजी आयपीएस अधिकारी किरण बेदी, सुप्रीम कोर्टाचे अधिवक्ता प्रशांत भूषण, समाजसेविका मेधा पाटकर आणि योगगुरू बाबा रामदेव यांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला.

या आंदोलनातूनच अरविंद केजरीवाल यांचे नेतृत्व समोर आले.त्यावेळेचे त्यांचे इंडिया अगेंस्ट करप्शन चे सहकारी योगेंद्र यादव,कवि डॉ. कुमार विश्वास इत्यादींनी आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. त्यावेळेच्या कॉंग्रेस प्रणीत केंद्र सरकारने जन लोकपाल आंदोलनाला गांभीयार्ने घेतले नाही. आंदोलन करणे सोपे काम असते. सत्तेत येऊन काम करणे कठीण काम असल्याने सत्तेत येऊन काम करून दाखवावे असे जाहीर आवाहन कॉंग्रेस पक्षाने केले होते.

याचा परिणाम अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या सहकारी लोकांवर झाला.त्यांनी आम आदमी पक्षाची स्थापना करून जनतेत जाऊन आपली मते प्रभावीपणे मांडलीत.भ्रष्टाचारा विरोधात रान उठविल्याने गरीब व सामान्य माणसाला आपले सरकारी कामे कुठलिही चिरीमिरी न देता सहजरीत्या होतील अशी अपेक्षा होती.ती अपेक्षा केजरीवाल मंत्रीमंडळाने काही प्रमाणात खरी करून दाखवली. म्हणून दिल्लीच्या जनतेने केजरीवालांना परत प्रचंड बहुमताने दिल्लीच्या गादीवर नेऊन बसविले.याच कारणाने फाजील आत्मविश्वास नडला आणि घात झाला.

आजही दिल्लीची जनता केजरीवालांना मानते आहे. परंतु त्यांचा भ्रमनिरास झाला आहे. केजरीवालांनी शैक्षणिक सुधारणा करून सरकारी शाळांना चांगले दिवस प्राप्त करून दिलेत. दिल्लीच्या सरकारी शाळांमधील मुलांची संख्या वाढवली.

मोहल्ला क्लिनिक सुरू करून आरोग्य व्यवस्था सुधारली.यामुळे खाजगी शिक्षण संस्था चालकांचा, खाजगी डॉक्टर्स मंडळींचा काही प्रमाणात रोष ओढवून घ्यावा लागला. याकडे संपुर्णपणे दुर्लक्ष झाले.मनीष सिसोदिया यांनी दिल्लीतील शाळांचे स्वरूपच बदलून टाकले. त्यांची किर्ती सर्वदूर पसरली. परंतु दिल्ली सरकारच्या चुकीच्या मद्य धोरणाने केजरीवाल सरकारची वाट लावली.हे सर्वचजण मान्य करतात आहेत.आम आदमी पक्षाची स्थापना ही देशातील भ्रष्टाचाराला संपुर्णपणे आळा घालण्यासाठी झाली होती. जनतेला यामुळे दिलासा मिळाला होता.

आम आदमी हा पक्ष वेगळी वाट धरून देशाच्या राजकारणात उतरला आहे अशी जनतेची खात्री झाली होती.केजरीवाल सरकारच्या मद्य धोरणाने भ्रष्टाचाराला प्रचंड प्रमाणात वाव मिळाला आणि यात सरकार मधील लोकांनीच हात धुवून घेतले असा आरोप करून अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यात केंद्र सरकारला बऱ्याच प्रमाणात यश आले. हे वास्तव स्विकारावेच लागेल.

आम आदमी पक्षाची स्थापना झाली तेंव्हा पत्रकार आशुतोष भारद्वाज, शाजिया इल्मी, मीरा सन्याल, माजी आयपीएस अधिकारी किरण बेदी, सुप्रीम कोर्टाचे अधिवक्ता प्रशांत भूषण, कवी कुमार विश्वास, इंडिया अगेंस्ट करप्शनचे सदस्य अंजली दमानिया, मयंक गांधी, कॅप्टन गोपीनाथ, प्रा. योगेंद्र यादव सारखे समाजाभिमुख लोक या पक्षाशी जोडले गेले होते.

एका चांगल्या संकल्पनेतून आप पक्षाची स्थापना झालेली होती. परंतु दिल्लीची सत्ता प्राप्त होताच पक्षाचे प्रमुख आणि संस्थापक संयोजक अरविंद केजरीवाल यांच्या एककल्ली कारभाराने अनेकांनी या पक्षातून काढता पाय घेणे पसंत केले. आपणं म्हणू तसाच पक्षाचा कारभार चालेल असा हेकेखोरपणा आड आला. मीपणाचा अहंभाव पक्षात बळावला गेला. याकारणाने खरेतर पक्षाची प्रचंड प्रमाणावर हानी झाली. पक्षातील धुरंधर नेते आप मधून बाहेर पडले. परंतु सत्तेची नशा डोळ्यावर चढल्या कारणाने याकडे दुर्लक्ष केले गेले.

जो कुणी पक्षविरोधी आवाज बुलंद करेल त्याला बाहेरचा रस्ता दाखवला गेला. कुणीही या विरोधात बोलण्यास धजावत नव्हते. यामुळेच आप पक्षात अरविंद केजरीवाल यांचे एकतर्फी वर्चस्व प्रस्थापित झाले. तेच त्यांना अपेक्षित होते. याच एककल्ली कारभाराने आप पक्षाचा घात झालेला पहायला मिळतो आहे. हा आम आदमी पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांसाठी फार मोठा धक्का आहे. याची दखल कोणं घेणार?

देशातील दोन महत्त्वाचे राष्ट्रीय पक्ष कॉंग्रेस आणि भाजप यांना दिल्लीतील जनतेने अनुभवले होते.त्यांची काम करण्याची पध्दत जवळपास सारखीच होती.यामुळे देशातील भ्रष्टाचाराला आळा बसला नव्हता तर तो प्रचंड प्रमाणावर वाढलेलाच होता. जनतेला भ्रष्टाचार नको असल्याने त्यांनी आपला जवळ केले होते.

सुरूवातीच्या काळातील आप ची धोरणे ही यांस सुसंगत अशीच होती.म्हणून दिल्लीच्या जनतेने दुसऱ्यांदा प्रचंड बहुमताने केजरीवालांना निवडून देवून सत्तेत नेऊन बसविले होते. यातच केंद्र सरकारने पंजाब व हरियाणा राज्यातील शेतकरी आंदोलनाला चिरडण्याचे काम केले होते.

शेतमालाला हमीभाव (एम.एस.पी.) मिळावा यासाठीचा कायदा पास करण्यात यावा यासाठीचे पंजाब, हरियाणातील शेतकरी वर्गाचे आंदोलन दिल्लीत जोमात सुरू होते. आपने या आंदोलनाला पाठींबा दिला, सहकार्य केले. राष्ट्रीय पक्ष कॉंग्रेसने कुठलिही याबाबत ठोस भुमिका घेतली नव्हती. याचा फायदा पंजाबच्या निवडणूकीत आप पक्षाला झाला.

यामुळे आप पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा सुध्दा प्राप्त झाला. राष्ट्रीय पक्षाची हवा आप मधील प्रमुख असलेल्या काही लोकांच्या डोक्यात शिरली. यामुळे पणं पक्षाचा घात झाला. भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन करणाऱ्या, लढणाऱ्या पक्षातील धुरीणांनाच जेंव्हा भ्रष्टाचाराची लागणं झाली तेंव्हा दिल्लीतील जनता हादरली.

मिलिंद गड्डमवार
सामाजिक कार्यकर्ते, मुक्त पत्रकार
राजुरा. जि. चंद्रपूर.
9511215200

पक्षाचे मुख्य संयोजक अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, डॉ.सत्येंद्र जैन, सोमनाथ भारती, राज्य सभेचे खासदार संजय सिंग यांना मद्य घोटाळ्यातील आरोपाखाली तुरुंगाची हवा खावी लागली. प्रामाणिकपणे व भ्रष्टाचार विरहीत राज्य कारभार करू इच्छिणारे राज्यकर्तेच जेंव्हा मद्य घोटाळ्यात अडकले तेंव्हा दिल्लीतील सामान्य जनतेची काय अवस्था झाली असेल? याचाच फटका केजरीवालांना बसला असे म्हणणे धाडसाचे ठरणार नाही.

अण्णांच्या भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनातून आप पक्षाची निर्मिती झाली होती. आप सत्तेत आल्यानंतरही संपुर्ण देशातून भ्रष्टाचाराचे निर्मूलन व्हावे यासाठीचे जनलोकपाल विधेयक हे लोकसभेत पारीत झालेले नव्हते. दिल्लीत सत्तेत आल्यानंतर या आंदोलनाची धग कमी झाली. पक्षातील लोक भ्रष्टाचार विरोधात आंदोलन करतांना कुठेही दिसून आलेले नाहीत. उलट त्यांचाच सहभाग भ्रष्टाचारात दिसू लागला.

निव्वळ जनतेला फुकट छाप योजनांची खैरात करून आपणं निवडून येऊ शकतो हा भ्रम जनतेने बाजूला सारला. तरीही सर्वच पक्ष रेवडी योजनांची खैरात करून सत्तेत येऊ पहात आहेत. यावर देशातील सुप्रीम कोर्टाने आक्षेप नोंदविला आहे. आप पक्षाची वाटचाल चुकीच्या दिशेने झाल्या कारणाने देशातील शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि सर्वसामान्य जनतेला याचा फटका बसणार आहे.

आज देशातील प्रमुख पक्षांना भांडवलदार लोकांनी घेरलेले आहे. त्यांच्या मगरमिठीत ते सापडलेले आहेत. याच कारणाने गरीबांचा, कष्टकरी लोकांचा आवाज दाबण्यासाठी या फुकटछाप योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे केली जात आहे. यामुळे कर भरणाऱ्या लोकांची कुचंबणा होत आहे. या लोकांना पणं खुश ठेवण्यासाठी केंद्र सरकारने कर पात्रतेची मयार्दा ही बारा लाखांवर आणून ठेवली. जेणेकरून त्यांच्या रोषाला सामोरे जावे लागू नये.

सद्यःस्थितीत सर्वांनाच काही ना काही मोफत सवलती देऊन,आमिष दाखवून त्यांचा आवाज दाबून ठेवण्यात केंद्र सरकारला यश प्राप्त झाले आहे.या फुकटछाप योजनांचा फुगा ज्या दिवशी फुटेल त्या दिवशी देशातील परिस्थिती ही आवाक्याबाहेर गेलेली असेल. देशात असंतोष माजलेला असेल. असे होवू नये असे वाटत असेल तर भ्रष्टाचार विरोधात आंदोलन करणारा, रस्त्यावर उतरून याविरोधात आक्रोश करणाऱ्या, जनतेचा आवाज बुलंद करणाऱ्या पक्षाची जनतेला आजही आस आहे. आप पक्ष आजही ती इच्छा पुर्ण करू शकतो. परंतु यासाठी जुन्या कलंकीत लोकांनी पक्षातून आरोप सिद्ध होत नाहीत तोपर्यंत पक्षाबाहेर राहिले पाहिजे. नव्या दम्याच्या लोकांना सत्तेची दारे खुली केली पाहिजेत.

कुणावरही भ्रष्टाचाराचे आरोप होणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. सत्ता महत्वाची नाही तर पक्षाची भुमिका, छबी ही स्वच्छ आणि पारदर्शक असली पाहिजे. आज ती कलंकीत झालेली आहे. यातून बाहेर पडण्यासाठी आणि जनतेतील छबी सुधारण्यासाठी प्रामुख्याने प्रयत्न करावे लागतील. पक्षाचा विचार देशभरात पसरविण्यासाठी कुणालातरी बाहेर पडावे लागेल. यासाठीचे कष्ट घ्यावे लागतील. हे काम आधीच व्हायला पाहिजे होते. परंतु भाजपने दिल्लीतच पक्षातील धुरीणांना गुंतवून ठेवले होते. तो त्यांच्या रणनितीचा एक भाग होता.ते यात यशस्वी ठरले. म्हणून आम आदमी पक्षाच्या विस्ताराला अंकुश बसला. आज त्याची राष्ट्रीय मान्यता कशी काढून घेता येईल यासाठीचे प्रयत्न सुरू झालेले असतील.

आम आदमी साठी सुद्धा हा एक धक्काच आहे. सामान्य जनतेचा, कष्टकऱ्यांचा, शेतकरी व शेतमजूर यांच्या उन्नतीचा विचार करणारा पक्षच आज देशात उरलेला नाही. याची दखल जनता केंव्हा घेणार आहे ? जनतेने स्वतःहून या फुकट छाप योजनांचा त्याग करून आपले कौटुंबिक उत्पन्न वाढविण्यासाठीचे प्रयत्न करणाऱ्या सरकारला, पक्षाला सत्तेत नेऊन बसविले पाहिजे.

आम आदमी पक्षाला स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी शार्टकट रस्ता पकडून चालणार नाही.तर स्वतःच्या पक्षाला कॅडर बेस्ड पक्ष बनवून तो तळागाळातील लोकांपर्यंत सर्वदूर पोहचवावा लागेल. आजपर्यंत असे झालेले नाही. सद्यस्थितीत आपच्या कलंकीत नेत्यांनी आरोप सिद्ध होत नाहीत तोपर्यंत पक्षाबाहेरच राहणे पसंत केले पाहिजे. याबाबत जनतेची जाहीरपणे माफी मागितली पाहिजे. पक्षाचा कारभार योग्य व निष्कलंक व्यक्तींच्या हाती सोपवीला गेला पाहिजे. प

क्ष वाढविण्यासाठी देशभरातील समस्या जाणुन घेऊन जागोजागी जन आंदोलन उभारावे लागेल. यासाठीचा लढा स्थानिक नेत्यांच्या नेतृत्वाखाली लढला गेला पाहिजे.देशात भ्रष्टाचार प्रचंड प्रमाणावर वाढलेला असतांना आपने आजपर्यंत भ्रष्टाचाराविरोधात कुठलेही आंदोलन हाती घेतलेले नाही. निव्वळ गोष्टी करून चालणार नाही तर स्थानिक पातळीवरील निवडणुकांना सामोरे गेले पाहिजे. याशिवाय कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास हा वाढीस लागणार नाही. एकदम विधानसभेच्याच निवडणुका लढवायच्या हा कुठला अट्टाहास आहे? आज देशाच्या ग्रामीण भागात कुठलेही आपचे जाळे पसरलेले नाही. निव्वळ निवडणूकीच्या तोंडावर निवडणुका लढविल्या गेल्याने पक्षाची वाढ ही होत नसते. राष्ट्रीय म्हणविणाऱ्या कॉंग्रेस पक्षाने सुध्दा हेच धोरण अवलंबिले आहे.

आज देशात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यांना वाचा फोडण्याचे काम कुठलाही विरोधीपक्ष करतांना आढळून येत नाही. तो फक्त निवडणुकीच्या तोंडावरच सक्रीय होतांना दिसून येतो आहे. याच कारणाने आज विरोधी पक्षांचे अस्तित्वच लोकसभेत, विधानसभेत दिसून येत नाही. ही लोकशाही व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे. यामुळे काही राष्ट्रीय पक्षांची मुजोरी ही वाढत चालली आहे. याला आळा घालण्यासाठी सक्षम विरोधी पक्षाची आज नितांत गरज निर्माण झाली आहे.

आज देशाला सक्षम विरोधी पक्षच लाभलेला नाही. हे आपले दुर्दैवच म्हणावे लागेल.भारतीय जनता पक्षाने सक्षम विरोधी पक्षाची भूमिका योग्य तऱ्हेने पार पाडलेली असल्याने ते आज सत्तेत दिसून येत आहेत. सर्वात जास्त काळ सत्तेत राहिलेल्या कॉंग्रेस पक्षाला सक्षम विरोधी पक्षाची भुमिका आजपर्यंत पार पाडता आलेली नाही, हे नमूद करावे लागते.

सक्षम विरोधी पक्षाची जागा आपने घेतल्यास पक्ष विस्ताराच्या दृष्टीने ते चांगले राहील. आज सर्वच पक्षात भ्रष्टाचाराची बजबजपुरी माजलेली आहे. कुठलाही पक्ष यातून सुटलेला नाही. परंतु जो चोरी करतांना सापडतो तो चोर अशी आपली भुमिका राहिलेली आहे. यासाठी जनतेच्या भुमिकेत सुध्दा बदल होने अपेक्षित आहे. आम आदमीचे सत्तेतील स्थान टिकविण्यासाठी आम आदमी सत्तेत जाऊन बसणे गरजेचे झाले आहे. याची दखल जनतेने घ्यावी.

■ ■ ■

# बुद्धीवर विश्वास ठेवणारा जगातला क्रांतिकारी शास्त्रज्ञ : महात्मा गौतम बुद्ध

**(कालच्या अंकावरून पुढे)**

महात्मा बुद्धांचे तेजस्वी, क्रांतिदर्शी विचार विज्ञानाच्या कसोटीवर खरे उतरतात. त्यांनी जगातील माणसांची परमेश्वर, देव नावाच्या तुरुंगातून सुटका केली. या धम्मात देवाच्या न दिसणाऱ्या अस्तित्वाला स्थानच नाही. देव-पिशाच्च, स्वर्ग-नरक, पाप-पुण्य, मोक्ष अशा संकल्पनांना स्थानच नाही. तरीही काही वैदिक धर्मियांनी बुद्धाला अवतार नावाचा मुखवटा चढवण्याचा प्रयत्न केला. ही बाब पूर्णतः असत्य आहे. निराधार आहे.



**उत्तरार्ध**

बुद्धाचं क्रांतिकारत्व त्यांच्या विचारात सामावलेलं होतं. ते स्वतःला माणूस म्हणवत. त्यांनी देवत्वाचा विरोध माणसाला माणूसपण बहाल केलं. चमत्कारांवर तर त्यांचा जराही विश्वास नव्हता. अवैज्ञानिक-काल्पनिक गोष्टींवर त्यांचा विश्वास नव्हता. त्यांनी यज्ञ संस्कृतीवर प्रखर हल्ला चढवला. तिचा कडाडून विरोध केला. त्यांनी हे धाडस करून या देशात महान क्रांती केली. बुध्द हे महान देशभक्त होते. महामानव होते. धम्म संस्थापक असूनही ते देव नव्हते. इतर धर्मांचे संस्थापक आपण माणूस आहोत, असे मानत नाहीत.

चित्त सर्व मानसिक प्रवृत्तीत प्रधान आहे. चित्तच प्रमुख आहे. चित्त साधना हे प्रथम साध्य आहे. चित्त हेच सर्व बयार्वाईटाचे स्त्रोत आहे, असे बुद्धाने ठामपणे प्रतिपादन केले. वाईट आणि चांगले ही चित्ताचीच निर्मिती असते. तृष्णा वाईट असते. तृष्णा हीच सर्व दुःखाचे कारण असते. तृष्णा म्हणजे तहान. माणसाला धनाची तहान असते. यशाची, कीर्तीची, प्रसिद्धीची तहान असते. ही तहान कधीच कमी होत नाही.

जेवढी तहान जास्त तेवढे दुःख अधिक. तृष्णेतूनच दुःखाची, संकरांची निर्मिती होते. जो तृष्णेला जवळ फिरकू देत नाही, तो सुखी असतो. त्यांनी दुःखमुक्तीचे आठ प्रकार किंवा उपाय सांगितले. ते अष्टांगमार्ग म्हणून परिचित आहेत. ते म्हणजे सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्म, सम्यक उपजीविका, सम्यक प्रयत्न, सम्यक स्मृती, आणि अभ्यक समाधी होय.

हिंदू धर्मात दुःख दूर करण्यासाठी देवपूजा, जप, अनुष्ठान, उपास, यज्ञ, नवस असे नाना उपाय सुचविले जातात. व्रतवैकल्य यज्ञ हा उपायही सांगितला जातो. स्त्रोत्र पठण करायला सांगतात. आतातर टेलिशॉपिंगमध्ये नजर सुरक्षा कवच, धन लक्ष्मी यंत्र, शनी रक्षक यंत्र असे अत्याधुनिक उपायही सुचवले जातात. त्यांची किंमत ही अव्वाच्या सव्वा असते. शोषणाला खतपाणी घालणारे हे उपाय आहेत. उलट बौद्ध धर्मात अशा अवैज्ञानिक उपायांना जराही थारा नाही.

हिंदू धर्म डोळ्यांवर धर्मग्रंथाची पट्टी बांधायला सांगतो. बौद्ध धम्म डोळे उघडे ठेवून विचार करायचे आवाहन करतो. बुद्धांनी घोडा-गाय-बैल अशा प्राण्यांची आहुती देणारा यज्ञ विझवून टाकला. शंकराचार्यांनी तो पुन्हा पेटवला. मग बहुजनांच्या शोषणाला प्रोत्साहन देणारे कोण?

म. बुद्धाचे तत्त्वज्ञान, तर्कशुद्ध विचार, विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्यता, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, नीती या मूल्यांवर आधारलेले आहे. त्यात भोंगळपणा, दंभ-ढोंग सापडत नाही. बुद्ध हा जगातला पहिला बुद्धीवर विश्वास ठेवणारा शास्त्रज्ञ. त्यांचा धम्म म्हणजे बुद्धीचा धर्म. जे सदबुद्धीला पटेल त्याचा स्वीकार करा. जे पटत नाही त्याला नकार द्या.

भारतीय राज्यघटनेचा डोलारा स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, नीती या पाच स्तंभावर उभा आहे. या अर्थाने बाबासाहेबांनी भारत बोद्धमय केला असे ठामपणे म्हणता येते. प्रज्ञावंत महापुरुष हे त्या राष्ट्राची वा व्यापक अर्थाने संपूर्ण जगाची विचार संपदा असतात. मौलिक ठेवा असतात. म्हणून बुद्धविचारांवर विसंबून जीवन सुखाने जगावे आणि बशीर बद्र यांच्या भाषेत तथागतांना विनंती करावी की,

*उजाले अपनी यादों के हमारे साथ रहने दो*
*न जाने किस गली में जिंदगी की शाम हो जाये*

शांती ही देणगी बुध्दानेच जगाला दिली. म.गांधींनी स्वातंत्र्य युद्धात तिचा महाशक्तीसारखा वापर केला. आज जगात सर्वत्र युद्धाची आग धुमसत आहे. कुठलाच देश सुरक्षित वाटत नाही. जगातील निर्दोष लोकांना युद्ध नकोच. त्यांना हवाय शांती प्रदान करणारा, करुणेचा सागर असलेला बुद्ध !

------------

**डी. बी. जगत्पुरिया**
**संगर, पाण्याच्या टाकीजवळ,**
**मीरानगर, पडेगांव, औरंगाबाद.**
**9860485398**

■ ■ ■



# शाब्बास पठ्ठे!

वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी एक दिवसीय सामन्यांच्या बाबतीत २०० विकेट्स घेणारा दुसरा सर्वात जलद गोलंदाज ठरला आहे. त्याच्याकडे आता १०४ सामन्यांमध्ये २०२ विकेट्स आहेत. या विक्रमात ऑस्ट्रेलियाचा मिशेल स्टार्क अव्वल स्थानावर आहे, त्याने १०२ सामन्यांमध्ये २०० एकदिवसीय विकेट्स पूर्ण केल्या.

मोहम्मद शमीने २०० एकदिवसीय बळींसाठी ५१२६ चेंडू टाकले. शमी सर्वात कमी चेंडू टाकून एकदिवसीय सामन्यात २०० बळी घेणारा गोलंदाज बनला. मिचेल स्टार्कने ५२४० चेंडूत २०० बळी पूर्ण केले. शमीने आयसीसीच्या मर्यादित षटकांच्या स्पर्धांमध्ये म्हणजेच ५० षटकांचा विश्वचषक, टी२० विश्वचषक आणि चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये ७४ विकेट्स घेतल्या आहेत. भारताचे नाव उज्वल केलास पठ्ठ्या... तुझ्या कामगिरीला सलाम.

■ ■ ■

# महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही. त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ. कारण त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची काल २१ फेब्रुवारी रोजी पुण्यतिथी होती. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा.

२३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. १५ व्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. १८२४ या वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला.

राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली, मात्र त्या डगमगल्या नाहीत.

त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला.

जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही. ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता. त्यामुळे राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता.

कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाच्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले.

राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा न करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला.

कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजारांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते. त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला.

राणी चेन्नमा यांचे सैन्य अशाप्रकारे मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले.

युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधिकाऱ्याची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैलहोगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आह. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

■ ■ ■

# प्लास्टिकच्या डब्यातील अन्न खाता? आरोग्यासाठी घातक ठरेल



आजकाल प्रत्येक घरात प्लास्टिकची भांडी वापरली जात आहेत. बाजारात उपलब्ध असलेले अनेक अन्नपदार्थही प्लास्टिकमध्ये पॅक केलेले असतात. लोकं पलास्टिकचा वापर करत आहेत. लोक बाजारातून प्लास्टिकच्या डब्यांमध्ये अन्न खरेदी करणे देखील पसंत करतात. पण प्लास्टिकमध्ये अन्न खाल्ल्याने आरोग्याला खूप नुकसान होऊ शकते. प्लास्टिक आपल्या शरीरामध्ये हळूहळू विषारी पदार्थ बनवतात.

प्लास्टिकमध्ये बिस्फेनॉल ए आणि फॅथलेट्स सारखी अनेक हानिकारक रसायने असतात. जेव्हा तुम्ही गरम अन्न प्लास्टिकच्या डब्यात साठवता तेव्हा ही रसायने अन्नात मिसळू शकतात. यामुळे शरीरात हार्मोनल असंतुलन निर्माण होऊ शकते आणि हृदयरोग, कर्करोग, लठ्ठपणा, मधुमेह इत्यादी अनेक आजारांना आमंत्रण मिळते.

तज्ज्ञांच्या मते, प्लास्टिकच्या डब्यात अन्न खाणे आरोग्यासाठी खूप हानिकारक आहे. प्लास्टिकच्या डब्यात पॅक केलेले अन्न खाल्ल्याने हृदयविकाराचा धोका वाढतो. जेव्हा हृदय शरीराच्या गरजेनुसार पुरेसे रक्त पंप करू शकत नाही तेव्हा ही स्थिती उद्भवते.

याचा अर्थ हृदयविकारात हृदयाचा पंप खराब होतो. यामुळे कालांतराने तुमच्या शरीराच्या इतर भागात रक्त जमा होऊ शकते. बहुतेक रक्त तुमच्या फुफ्फुसांमध्ये, पायांमध्ये आणि बोटांमध्ये जमा होऊ लागते, ज्यामुळे नंतर हृदयविकाराचा धोका निर्माण होऊ शकतो. पॅकेज्ड फूड कर्करोगासारख्या घातक आजारांनाही आमंत्रण देते.

तज्ज्ञांच्या मते, प्लास्टिकमध्ये असलेले काही रसायने शरीरात बराच काळ साचत राहतात आणि हळूहळू कर्करोगासारखे धोकादायक आजार होऊ शकतात. विशेषतः जेव्हा गरम अन्न प्लास्टिकच्या पॅकेटमध्ये आणले जाते तेव्हा कर्करोगाचा धोका आणखी वाढतो.

प्लास्टिकमध्ये विषारी घटक असतात ज्यामुळे तुमच्या शरीरातील हार्मोन्स असंतुलित होतात. यामुळे पुरूषांमधील शुक्राणूंची संख्या कमी होऊ शकते, ज्यामुळे भविष्यात मूल होण्यात समस्या येऊ शकतात. तसेच महिलांमध्ये मासिक पाळीशी संबंधित समस्या उद्भवू शकतात.

जर तुम्ही दररोज प्लास्टिकच्या भांड्यांमध्ये अन्न खाल्ले तर हळूहळू त्याचे छोटे कण शरीरात जमा होऊ लागतात. यामुळे गॅस, ॲसिडिटी, बद्धकोष्ठता आणि पोटदुखीसारख्या समस्या उद्भवू शकतात. प्लास्टिक केवळ आपल्या आरोग्यासाठीच नाही तर पृथ्वीसाठीही धोकादायक आहे. प्लास्टिक शेकडो वर्षे नष्ट होत नाही आणि माती आणि पाणी दूषित करते. यामुळे पर्यावरणाचे नुकसान होते.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### जागतिक राष्ट्रभाषा दिन

बाह्य उपचार कितीही करा
भाषा होणार नाही सुदृढ
बोला मराठी लीहा मराठी
प्रचलनात भाषा होईल रुढ ..

'माय मराठी ' म्हणवून घेता
करता तिच्याशी दुजा भाव
अन्यभाषिक का स्विकारतील
विचारा प्रश्न मनालाच राव ?

पाट्या बदला टोप्या बदला
बदला तुम्ही झेंडे
मनी परिवर्तन नाही तोवर
परिणाम दिसून येईल का गडे?

## वाचक लिहितात

### ही तर बेरोजगारांची फसवणूकच...

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांच्यापूर्वी महायुती सरकारने घोषणांचा पाऊस पाडला. एसटी प्रवासात महिलांना ५० टक्के सूट दिली. जसजशी निवडणूक जवळ येत होती तसतशा घोषणा वाढत होत्या, आश्वासनांचा पूर येत होता.

लाडकी बहिण योजनेबरोबरच सरकारने बेरोजगार तरूणांसाठीही काही योजना राबविणार असल्याचे सांगितले होते. विविध आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवार म्हणून कंत्राटी स्वरूपात नोकरीवर ठेवणे आणि ठराविक मानधन देण्याची ही योजना होती. तथापि, निवडणूक झाल्यानंतर या योजनेचे काय झाले? कुणालाच ठाऊक नाही.

त्यावेळी काही कार्यालये आणि कंपन्यांमध्ये कामावर लागलेले हे लाडके भाऊ आता कॅरम सेंटर आणि चहाच्या टपऱ्यांपर दिसून येतात. सरकारने घोषित केलेली ती योजना म्हणजे तरूण मतदारांची मते मिळविण्याचा एक फार्स होता, असे हेच लाडके भाऊ आता सांगत आहेत.

लाडकी बहिण योजनेतून लक्षावधी महिलांना अपात्र ठरविण्यात आले आहे. महिला आणि ज्येष्ठांना एसटी प्रवासात दिलेल्या सवलतीमुळे एसटी महामंडळ तोट्यात आल्याचे याच खात्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी जाहिररित्या सांगितले आहे. म्हणजे, सरकारने निवडणुकीपूर्वी केले ते ढोंग होते.

■ **प्रशांत काळबांधे, नागपूर .**

# रणवीर सिंग बनला स्कोडा ऑटो इंडियाचा पहिला 'ब्रँड सुपरस्टार'




नागपूर, २१ फेब्रुवारी : आपली पहिली सब-४-मीटर एसयूव्ही कायलॅक लाँच केल्यानंतर स्कोडा ऑटो इंडियाने आणखी एक टप्पा संपादित केला आहे, जेथे आपला पहिला 'ब्रँड सुपरस्टार' म्हणून पॉवरहाऊस रणवीर सिंगची घोषणा केली आहे. हा सहयोग सिग्नेचर, स्कोडा स्टाइल, ग्राहक-केंद्रित मोहिमांशी संलग्न आहे, ज्यांना स्कोडा ऑटा इंडियाचे चाहते व ग्राहकांसाठी रणवीर सिंगने अधिक उत्साहित केले आहे.

या सहयोगाबाबत मत व्यक्त स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक पीटर जनेबा म्हणाले, भारतातील आमच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच मला स्कोडा ऑटो इंडियासाठी पहिला 'ब्रँड सुपरस्टार' म्हणून रणवीर सिंगची घोषणा करण्याचा अभिमान वाटत आहे. पडद्यावर व पडद्यामागे टॅलेंट व ऊर्जेचा पॉवरहाऊस रणवीरच्या व्यक्तिमत्त्वामधून आमची आवड आणि तत्त्व दिसून येतात. आम्ही जागतिक सर्वोत्तमतेची १३० वर्षे साजरी करत असताना ही घोषणा करण्यात आली आहे. या सहयोगांतर्गत आमची उत्पादने, आमचे नेटवर्क आणि ग्राहकांसाठी अनेक गोष्टी सादर केल्या जाणार आहेत, जेथे आम्ही युरोपबाहेर स्कोडासाठी सर्वात महत्त्वपूर्ण बाजारपेठ म्हणून आमचे स्थान अधिक प्रबळ करण्यास उत्सुक आहोत.

स्कोडा ऑटो इंडियासाठी पहिले ब्रँड सुपरस्टार रणवीर सिंग म्हणाले, मला स्कोडा ऑटो इंडियाचा पहिला ब्रँड सुपरस्टार बनण्याचा आनंद होत आहे. या सहयोगामधून सर्वोत्तमतेप्रती समान कटिबद्धता दिसून येते आणि मी भारतात स्कोडा ऑटोच्या विकासाप्रती योगदान देण्यास उत्सुक आहे. स्कोडा ऑटोचा वैविध्यपूर्ण व उत्साहवर्धक उत्पादन पोर्टफोलिओ आहे, जो भारतातील वाढत्या बाजारपेठेमधील ऑटोमोटिव्ह उत्साही आणि व्यापक ग्राहकवर्गाच्या गरजांची पूर्तता करतो. प्रबळ वारसा आणि उत्पादनांच्या आयकॉनिक श्रेणीसह ब्रँड ऑटोमोटिव्ह उद्योगामध्ये उच्च मापदंड स्थापित करत आहे.

# भारतातील ई-कॉमर्स निर्यात वाढवण्यासाठी ॲमेझॉन आणि डीजीएफटी यांच्यातील सहकार्याचा विस्तार



नवी दिल्ली, २१ फेब्रुवारी : ॲमेझॉन आणि परराष्ट्र व्यापार महासंचालनालय (डीजीएफटी) यांनी आज भारतातील ई-कॉमर्स निर्यातीला गती देण्यासाठी आपसांतील सहकार्याचा विस्तार जाहीर केला. या दोन्ही संस्थांमध्ये नोव्हेंबर २०२३मध्ये प्रारंभिक सामंजस्य करार झाला होता, त्यावर हा विस्तार आधारित आहे. सरकारच्या जिल्हा निर्यात हब उपक्रमाचा लाभ घेऊन सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या (एमएसएमई) निर्यातीला चालना देणे हा या कराराचा उद्देश होता. नूतनीकरण झालेल्या सहकार्यातून संपूर्ण भारतातील एमएसएमईंना ई-कॉमर्स निर्यातीत यशस्वी होण्यासाठी आवश्यक ती कौशल्ये आणि संसाधने उपलब्ध करून देण्यात येतील. या सामंजस्य कराराचे नूतनीकरण अतिरिक्त सचिव व डीजीएफटीचे महासंचालक संतोष सारंगी, ॲमेझॉनच्या सार्वजनिक धोरण विभागाचे उपाध्यक्ष चेतन कृष्णस्वामी आणि मेझॉन इंडियाच्या जागतिक व्यापार विभागाचे संचालक भुपेन वाकणकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव व डीजीएफटीचे महासंचालक संतोष सारंगी यांनी याप्रसंगी सांगितले, ॲमेझॉनसोबतचे आमचे सततचे सहकार्य हे प्रत्येक जिल्ह्याला निर्यात केंद्र बनवण्याच्या सरकारच्या धोरणाचाच एक भाग आहे. आम्हाला या कामी सुरुवातीपासूनचे मोठे यश मिळत गेले. त्याच बळावर आम्ही आता ४७ जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करीत आहोत. त्यामुळे अधिकाधिक एमएसएमईंना जागतिक बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळू शकेल. या भागीदारीमुळे यापूर्वी ३,०००हून अधिक एमएसएमईंना लाभ मिळालेला आहे आणि याचाच पुढील विस्तार पाहण्यास आम्ही उत्सुक आहोत. २०३०पर्यंत २०० ते ३०० अब्ज रुपयांच्या निर्यातीचे आमचे लक्ष्य आहे. ते साध्य करण्याच्या उद्दिष्टाशी हा कार्यक्रम पूर्णपणे सुसंगत आहे, 'मेक इन इंडिया' या धोरणाची उत्कृष्टता जागतिक स्तरावर प्रदर्शित करण्यास हा कार्यक्रम मदत करेल.

ॲमेझॉन इंडियाच्या जागतिक व्यापार विभागाचे संचालक भुपेन वाकणकर म्हणाले, डीजीएफटीसोबतच्या आमच्या सहकार्याचा विस्तार करताना आम्हाला आनंद होत आहे. या सहकार्यामुळे संपूर्ण भारतातील एमएसएमई आणि उद्योजक यांना जागतिक पातळीवर व्यवसाय करण्यास आणि भारताच्या एकूण निर्यातीस हातभार लावण्यास मदत होईल. २०२३ पासूनच्या आमच्या सहकार्याने आतापर्यंत आशादायक परिणाम दाखवले आहेत. म्हणूनच यावर्षी आम्ही ४७ जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले आहे. निर्यात प्रक्रिया अधिक सोपी आणि सर्व प्रकारच्या व्यवसायांसाठी सुलभ व्हावी, याकरीता ॲमेझॉन प्रयत्नशील आहे. त्यादृष्टीने भारतामधून २०३० पर्यंत ८० अब्ज डॉलर्सची एकत्रित ई-कॉमर्स निर्यात साध्य करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.

# स्फूर्तिगीतातून भाजपाच्या संघटन वाढीला बळकटी

## प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची संकल्पना

अकोला, २१ फेब्रुवारी : भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्रात संघटन पर्व सुरू केले असून, दीड कोटी सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट ठेवले आहे. कार्यकर्त्यांच्या संघटनासाठी विविध माध्यमांचा वापर करून जनतेला आकर्षित करण्याचा आणि भाजपाची राष्ट्र प्रथम ही विचारधारा लोकांपर्यंत पोहोचवण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे. याचाच एक भाग म्हणून, भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेले भाजपा स्फूर्तिगीत नुकतेच प्रकाशित करण्यात आले. या ऊर्जादायी गीताचे विमोचन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत आयोजित सदस्यता महाअभियान २०२५ अंतर्गत संघटन पर्व कार्यशाळेत झाले. जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेल्या भाजपाची ''राष्ट्र प्रथम, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः'' ही विचारधारा सामान्य लोकांपर्यंत पोहोचवून, पक्षसंघटन अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने भाजपाने हे स्फूर्तिगीत तयार केले आहे. देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे यशस्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात पक्षाला कार्यकर्त्यांचे अधिकाधिक बळ मिळावे, पक्ष संघटना मजबूत व्हावी तसेच भाजपातर्फे सुरु असलेल्या देश विकासाच्या कार्यात जास्तीत जास्त नागरिक जोडले जावे यासाठी या स्फूर्तीगीताची संकल्पना राबविण्यात आल्याचे प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.

स्फूर्तिगीतामध्ये उज्ज्वल भारतासाठी असलेल्या भाजपाच्या ध्येयधोरणांचे, कार्यशैलीचे, लोकनेत्यांचे तसेच कार्यकर्त्यांच्या निष्ठेचे आणि समर्पणाचे चित्रण करण्यात आले आहे. विविध प्रचारसभांमधून आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून हे गाणे अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवले जाणार आहे. या उपक्रमामुळे कार्यकर्त्यांचा पक्षाप्रती आदर वाढून देशकार्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.

भाजपाच्या संघटन विस्ताराला चालना देणारा हा एक कलात्मक आणि प्रेरणादायी उपक्रम आहे, असे प्रतिपादन रवींद्र चव्हाण यांनी केले. समाजमाध्यमातून आणि पक्ष संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात हे स्फूर्तिगीत पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# महाशिवरात्रीच्या निमित्ताने सोनी सबचे कलाकार सांगत आहेत भगवान शिवाशी असलेले आपले आध्यात्मिक नाते



मुंबई, २१ फेब्रुवारी : या महाशिवरात्रीच्या निमित्ताने कृष्ण भारद्वाज, प्रियंवदा कांत, आरव चौधरी, माहिर पांधी आणि सायली साळुंखे हे सोनी सबचे कलाकार सांगत आहेत की त्यांच्या जीवनात या पवित्र दिवसाचे काय महत्त्व आहे. या अभिनेत्यांसाठी महाशिवरात्री हा केवळ एक सण नाही, तर ते भक्ती आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचे पर्व आहे. उपवास आणि पारंपरिक पूजा-अर्चा करण्यापासून ते भगवान शिवाच्या दिव्यत्वातून प्रेरणा घेईपर्यंत या दिवसाचे प्रत्येकासाठी काही तरी आगळे महत्त्व आहे. या प्रत्येकाचा हा देखील अनुभव आहे की, शिवरात्रीच्या व्रतामुळे त्यांची श्रद्धा कशी अधिक दृढ होते आणि त्यांना मानसिक शांती आणि सद्भावनेचा अनुभव होतो.

तेनाली रामा मालिकेत तेनालीची भूमिका करणारा कृष्ण भारद्वाज म्हणतो, महाशिवरात्री हा परिवारासोबत साजरा करण्यात येणारा एक मोठा सण आहे. मी अगदी लहान असल्यापासून शिवरात्रीच्या दिवशी उपवास करत आहे. ही शिवरात्री माझ्यासाठी विशेष आहे, कारण त्यावेळी माझे आई-वडील देखील माझ्यासोबत मुंबईत आहेत. त्या दिवशी माझी आई मारवाडी पद्धतीचे फराळी पदार्थ करणार आहे, ज्याचा आस्वाद घेण्यासाठी मी आसुसलो आहे.

तेनाली रामा मालिकेत शारदा ही व्यक्तिरेखा साकारणारी अभिनेत्री प्रियंवदा कांत म्हणते, मी शिवभक्त असल्यामुळे शंकराची दिव्य ऊर्जा आणि प्रतिकात्मकता यातून मला प्रेरणा मिळते. शंकराचा तिसरा नेत्र आपल्याला जे भौतिक नजरेला दिसते त्याच्या पलीकडे बघण्याचे स्मरण देतो आणि आपल्या अंतःप्रेरणेवर विश्वास ठेवण्याची प्रेरणा देतो. त्याचा त्रिशूळ आपल्या अहंकार, मन आणि बुद्धी यांचा समतोल साधायला शिकवतो. शिवाच्या आशीर्वादाने आपणा सर्वांना शांती, सलोखा आणि स्वत्वाची जाणीव यांचा लाभ होऊ दे. माझ्यातर्फे सगळ्यांना महाशिवरात्रीच्या शुभेच्छा!

वीर हनुमान मालिकेत केसरीची भूमिका करणारा आरव चौधरी म्हणतो, मी तसा आध्यात्मिक वृत्तीचा आहे. त्यामुळे महाशिवरात्रीचे माझ्या मनात विशेष स्थान आहे. दर वर्षी, मी भक्तिभावाने शंकराची पूजा करतो. त्यात शिवलिंगावर दूध आणि पाण्याचा अभिषेक करून बेलपत्र, धतुरा, चंदन वाहतो आणि फळे अर्पण करतो. पूजा करताना केलेल्या मंत्रोच्चारामुळे आणि दिवे तेवत असल्याने एक शांत आणि दिव्य वातावरण उभे राहते. माझ्यासाठी हे विधी करणे हा केवळ परंपरेचा भाग नसून ते माझ्या मनःशांतीसाठी आणि ईश्वराच्या ठायी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आहे.

वीर हनुमान मालिकेत वाली आणि सुग्रीवची दुहेरी भूमिका करत असलेला माहिर पांधी म्हणतो, महाशिवरात्रीची जी नीलकंठ कथा आहे, ती फारच अचंबित करणारी आहे. समस्त विश्वाचे रक्षण करण्यासाठी भगवान शिवाने समुद्रमंथनातून निघालेले हलाहल कसे स्वतः प्राशन केले या गोष्टी माझे वडील सांगत असत. या सणाच्या दिवशी मला हटकून ते बालपणीचे दिवस आठवतात. मी सर्वांना शिवरात्रीच्या शुभेच्छा देतो- जय महाकाल!

वीर हनुमान मालिकेत अंजनीची भूमिका करत असलेली अभिनेत्री सायली साळुंखे म्हणते, महाशिवरात्री ही ध्यानासाठी अत्यंत पवित्र मानले जाणारे पर्व आहे. मी या दिवशी न चुकता उपवास करते. असे म्हणतात की, या दिवशी मनोभावे शिव पूजा केल्यास भक्त जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्त होतो आणि त्याला मोक्ष मिळतो. या पवित्र दिनी भगवान शंकराचा आशीर्वाद आपणा सर्वांना लाभो!

# सॅमसंग इंडियाकडून गॅलॅक्सी ए०६ ५जी लाँच




गुरूग्राम, २१ फेब्रुवारी : सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज गॅलॅक्सी ए०६ ५जी च्या लाँचची घोषणा केली, जेथे किफायतशीर दरामध्ये ऑसम ५जी अनुभव आणला आहे. सर्वात किफायतशीर गॅलॅक्सी ए सिरीज ५जी स्मार्टफोन गॅलॅक्सी ए०६ ५जी विश्वसनीय कार्यक्षमता व दीर्घकाळपर्यंत टिकाऊपणासह ग्राहकांना अधिक मूल्य देण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे.

आजपासून गॅलॅक्सी ए०६ ५जी भारतभरातील सर्व रिटेल आऊटलेट्स, सॅमसंग एक्सक्लुसिव्ह स्टोअर्स, तसेच इतर ऑफलाइन चॅनेल्समध्ये विविध स्टोरेज व्हेरिएण्ट्समध्ये उपलब्ध असेल. ४ जीबी रॅम व ६४ जीबी स्टोरेज असलेल्या व्हेरिएण्टसाठी फक्त १०४९९ रूपयांपासून किंमत सुरू होणारा गॅलॅक्सी ए०६ ५जी तीन स्लीक व आकर्षक रंगांमध्ये येतो - ब्लॅक, ग्रे आणि लाइट ग्रीन. स्पेशल लाँच ऑफर म्हणून ग्राहक फक्त १२९ रूपयांमध्ये सॅमसंग केअर+ सह एक-वर्ष स्क्रिन प्रोटेक्शन प्लॅनचा आनंद घेऊ शकतात, ज्यामधून अतिरिक्त संरक्षण व मन:शांती मिळते.

गॅलॅक्सी ए०६ ५जी च्या लॉचसह आम्ही उत्तम ५जी अनुभवासाठी सेगमेंट-लीडिंग १२ ५जी बँड्स आणत आहोत. ऑसम कनेक्टीव्हीटी, शक्तिशाली कार्यक्षमता आणि सेगमेंट लीडिंग इनोव्हेशन्स देण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला हा डिवाईस सर्वांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याप्रती आमची कटिबद्धता अधिक दृढ करतो. या डिवाईससह आम्ही खात्री घेत आहोत की, वापरकर्ते काम व मनोरंजनासाठी हाय-स्पीड कनेक्टीव्हीटीसोबत अद्वितीय टिकाऊपणाचा आनंद घेऊ शकतात,'' असे सॅमसंग इंडियाच्या एमएक्स बिझनेसचे महाव्यवस्थापक अक्षय एस. राव म्हणाले.

# झेप ॲलर्ट! कुमकुम भाग्यमध्ये प्रणाली राठोड आणि अक्षय देव बिंद्रा साकारणार मुख्य भूमिका!



मुंबई, २१ फेब्रुवारी : भावनिक नाट्य आणि आकर्षक कथाकथनासाठी ओळखली जाणारी झी टीव्हीवरील लाडकी मालिका 'कुमकुम भाग्य' आता एका नवीन अध्यायासाठी सज्ज झाली आहे. आगामी झेपेसोबत या मालिकेत नवीन चेहरे आणि नातेसंबंधांची ओळख करुन दिली जाईल आणि कथेला एक नवीन पैलू प्राप्त होईल. या झेपेच्या केंद्रस्थानी राजवंश आणि पूर्वी यांची मुलगी प्रार्थना (प्रणाली राठोड) आहे. एका विनम्र पंडित आणि त्याच्या पत्नीची ही मुलगी मृदूभाषी, मेहनती आणि आपल्या कुटुंबासाठी समर्पित आहे. तिच्या साध्या संगोपनानंतरही तिची एका श्रीमंत कुटुंबातील एक आकर्षक आणि दिमाखदार तरुण रौनक (अक्षय देव बिंद्रा) सोबत गाढ मैत्री आहे.

लहानपणीचे दोस्त प्रार्थना आणि रौनक हे पूर्णपणे वेगळ्या जगातून आले असून तिचे जग साधे आणि जबाबदाऱ्यांनी भरलेले, तर त्याचे जग आरामदायी आणि विशेषाधिकाराने. तरीही त्यांची मैत्री वर्षानुवर्षे अढळ राहते. आयुष्य अनपेक्षित वळण घेत असताना त्यांचे हे अतूट नाते प्रेक्षकांच्या मनात प्रश्न उभा करेल: क्या सच्ची दोस्ती में भी प्यार हो सकता है?

अक्षय देव बिंद्रा म्हणाला, कुमकुम भाग्य या मालिकेतून टेलिव्हिजनवर पदार्पण करायला मिळणे हे माझे भाग्य आहे! ही अतिशय उल्लेखनीय असा वारसा असलेली मालिका आहे आणि जेव्हा मी या भूमिकेसाठी ऑडिशन दिले तेव्हा मला माझे सर्वोत्तम द्यावे लागेल याची मला पूर्ण कल्पना होती. ज्या क्षणी मला कळले की की ही भूमिका मला मिळाली आहे तेव्हा मी अक्षरशः भारावून गेलो! या मालिकेची संपूर्ण टीम प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे कथानक तयार करण्यासाठी प्रचंड मेहनत घेत आहे आणि आता प्रेक्षक या नवीन पर्वाचे स्वागत कशा प्रकारे करतात हे पाहण्यासाठी मी उत्सुक आहे.

प्रणाली राठोड म्हणाली, २०२५ हे वर्ष खरोखरच खास आहे कारण मी कुमकुम भाग्य या प्रतिष्ठित मालिकेचा हिस्सा बनणार आहे. प्रार्थनाची व्यक्तिरेखा माझ्यासाठी नवीन आणि वेगळी असून तिला जीवंत करण्यासाठी मी उत्सुक आहे. ही मालिका नेहमीच आपल्या भावस्पर्शी कथाकथन आणि मजबूत नातेसंबंधांसाठी ओळखली जाते आणि या मालिकेच्या या जगात पाऊल ठेवणे हा एक अद्भुत अनुभव आहे. कुमकुम भाग्य प्रेक्षकांना अनेक वर्षांपासून खूप आवडत आली असून या नवीन पर्वाचा स्वीकारही ते तेवढ्याच प्रेमाने आणि उत्साहाने करतील अशी मी अपेक्षा करते.

प्रेम, हृदयभंग आणि कौटुंबिक संघर्ष केंद्रस्थानी असलेली 'कुमकुम भाग्य' ही मालिका एका नवीन पर्वासह परतण्यासाठी सज्ज आहे.


## आज का अंदाज

शनिवार २२ फेब्रुवारी २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | २ | ५ | ६ | ७ |
| २५६ | ६०० | ११५ | २८० | २०० | २५८ | ६०० | ३४० |
| ३५५ | ७९० | ३७७ | ३७० | ३९० | ७८० | ५५६ | २५० |
| १५७ | ८८० | २२३ | ४६० | ४८० | ६९० | ३५८ | १६० |
| ३९ | ६९ | ७२ | ०२ | २१ | ५१ | ६३ | ७३ |
| ३५ | ६५ | ७४ | ०४ | २० | ५० | ६८ | ७८ |
| ३१ | ६१ | ७८ | ०८ | २९ | ५९ | ६४ | ७४ |

२२ फेब्रुवारी: सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ४० | २५ | ३५ |
| १४ | ४१ | २६ | ३६ |
| १६ | ४७ | २८ | ३८ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** आज शारीरिक आणि मानसिक तणाव जाणवेल. कौटुंबिक सदस्यांचे प्रेम आणि आपुलकीने हृदय प्रभावित होईल. ताप, उलट्या, डोकेदुखी यासारख्या कोणत्याही मौसमी आजाराला तुम्ही बळी पडू शकता.

**वृषभ :** दिवसाची सुरुवात काही विशिष्ट बातम्यांनी होईल. तुम्हाला चांगली बातमी मिळू शकते. व्यावसायिक कामासाठी तुम्हाला बाहेरगावी जावे लागेल. स्वत:कडे लक्ष पुरवा.

**मिथुन :** दारू पिऊन गाडी चालवणे टाळा. अन्यथा तुम्हाला गंभीर दुखापत होऊ शकते. त्यामुळे तुम्हाला रुग्णालयात दाखल करावे लागू शकते. आज व्यवसायात उत्पन्न चांगले राहील.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी तुम्ही तुमच्या धोरणानुसार काम करावे. कोणाच्या बोलण्यात अडकू नका. आज तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या. प्रेमसंबंधांमध्ये भावनिक जोड वाढेल. तणाव टाळण्याचा प्रयत्न करा.

**सिंह :** आर्थिक क्षेत्रातील महत्त्वाच्या व्यक्तीकडून अपेक्षित सहकार्य न मिळाल्याने पैसे मिळण्यात अडथळे येऊ शकतात. बँकेत जमा केलेले पैसे काढण्यासाठी तुम्हाला खूप त्रास सहन करावा लागणार आहे.

**कन्या :** नोकरदार लोकांसाठी परिस्थिती अनुकूल राहणार नाही. आज वडिलोपार्जित संपत्ती मिळण्याचा अडथळा दूर होईल. बेरोजगारांना रोजगार मिळेल. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल.

**तुळ :** अडकलेले पैसे परत मिळू शकतात. चैनीच्या वस्तूंवर जास्त खर्च होईल. नोकरीत अधीनस्थ लाभदायक ठरतील. आज प्रेम संबंधात परस्पर आनंद आणि सहकार्य राहील.

**वृश्चिक :** आज शत्रू तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतील. सामाजिक आदर आणि प्रतिष्ठेची जाणीव ठेवा. जास्त वाद टाळा. स्वत:वर विश्वास ठेवा. काम पूर्ण होईपर्यंत उघड करू नका.

**धनु :** आर्थिक क्षेत्रात जुन्या उत्पन्नाच्या स्रोतांकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. भावनिक जोड वाढेल. प्रेमसंबंधांमधील रेंगाळलेले मतभेद कमी होतील. जास्त भावनिकता टाळा.

**मकर :** आज तुम्हाला कठोर परिश्रमानंतर यश मिळेल. विरोधी पक्ष तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतील. भावनांना सकारात्मक दिशा द्या. व्यावसायिक समस्यांबाबत अधिक जागरूक राहावे.

**कुंभ :** आज तुम्हाला तुमच्या प्रिय व्यक्तीची पुन्हा पुन्हा आठवण करून वाईट वाटेल. अज्ञात व्यक्तीकडून अपेक्षित मदत मिळाल्याने तुमचे धैर्य आणि मनोबल वाढेल. प्रवास करताना सावधगिरी बाळगा.

**मीन :** प्रेमसंबंधांमध्ये अधिक महत्त्वाकांक्षा वाढू शकते. आज तुमच्या चुकीच्या खाण्याच्या सवयी काही नवीन संकटांना आमंत्रण देऊ शकतात. श्वसनाचे आजार गंभीर होण्याआधी त्यांच्यावर योग्य उपचार करा.


# कार्यालय, नगर परिषद, मुल जिल्हा चंद्रपुर

टोल फि क्रमांक १८००२७०९४०० EMAIL ID- mcmu1220356@gmail.com

दुरध्वनी क्रमांक ०७१७४-२२०३५६

व.शि.क्र./मालमत्ता विभाग/२०२५/३७३ दिनांक. २१/०२/२०२५

## जाहीर ई लिलाव सुचना

नगरपरिषद मुल मालकीचे मा.सा. कन्नमवार सभागृह करारनामा दिनांकापासून १ वर्ष कालावधी करिता भाडेतत्वावर देनेबाबत ई लिलाव करणेकरिता इच्छुक लिलावधारकांच्या सहभागाकरिता जाहीर ई लिलाव सुचना प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर ई- लिलावाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. ई-लिलाव प्रक्रीयेसबंधी संपूर्ण माहिती https://eauction.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. ई-लिलावात सहभाग घेणेकरिता उपरोक्त संकेतस्थळावर आपले युजरनेम पासवर्ड नोंदणी करणे आवश्यक राहील. तसेच स्वतःच्या नावाचे Digital Signature certificate key (DSC) वापरून ई लिलावात भाग घेता येईल.

३. ई- लिलावाच्या अटी शर्ती, लिलाव फी, लिलाव अनामत, प्रशासकीय रक्कम/बोली रक्कम, इत्यादी तपशील व इतर सर्व माहिती https://eauction.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.


ई- लिलाव वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे

| विवरण | दिनांक पासून | दिनांक पर्यंत |
|---|---|---|
| ई लिलाव प्रसिद्धी व आवश्यक दस्तऐवज अपलोड करणे | दि. २४/०२/२०२५ | दि. ०४/०३/२०२५ |
| दस्तऐवज व पावती (लीफाफाबंध) नगर परिषद मुल, कार्यालयात जमा करणे | दि. २४/०२/२०२५ | दि. ०४/०३/२०२५ |
| दस्तऐवज तपासणी व मंजुरी | दि. ०५/०३/२०२५ | दि. ०५/०३/२०२५ (दुपारी ३ वाजेपर्यंत) |
| प्रत्यक्ष ऑनलाईन ई लिलाव | दि. ०६/०३/२०२५ (दुपारी १२ वाजेपासून) | दि. ०६/०३/२०२५ (दुपारी ३ वाजेपर्यंत) |

प्रशासक नगरपरिषद मुल

मुख्याधिकारी नगर परिषद मुल


# शब्दकोडे क्रमांक २०४०



**आडवे शब्द :-**

१) धंदा, व्यापार
३) पूर्णपणे
६) सारखा
८) खून
९) वेतन
१०) चालू काळ
१२) उगाच, कारण नसताना
१३) गहाण
१४) आदरासह
१६) कणीदार
१७) देवीच्या नावाणे मागीतलेली भिक्षा
१९) उपनगर
२१) झकास
२२) हेळसांडा
२३) पवित्र
२४) वेळ, मृत्यू
२५) खुंट, आंचळ
२६) पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
२८) तपासनीस (इं )
३०) घाव, प्रहार
३१) शपथ
३२) दाट मैत्री
३३) पिवळा
३४) पिता
३५) सटवाई
३७) पती
४०) श्रीविष्णू
४३) स्वत:चे
४४) फणसातील खाद्य
४५) राणीचा पती
४६) बिल्व
४७) सेनापती
४८) पद्धत
४९) रात्र
५०) विविध
५१) गाडीचे छत
५३) बडबड्या
५५) वजन
५६) धनी
५८) खर, रासभ
६०) अवस्था, स्थिती
६२) हरिणाची एक जात
६४) गमन करणे
६५) हमाल
६७) एक पौराणिक पर्वत
६९) अरण्य
७१) मन, मनातील विचार,
७२) मिठी
७३) न वापरलेला
७४) मोठी सतरंजी
७५) पाणी
७६) सोनार
७७) व्यापारी फायदा

**उभे शब्द :-**

१) गर्क झालेला
२) सांजवेळ
३) नातेवाईक
४) परतफेड
५) लोणचे
६) संतोषजनक
७) अंत:करण
८) हळकुंडाचे चूर्ण
९) आजोबांचे वडील
११) बांगड्यांचा व्यवसाय करणारी जमात
१२) अवाजवी
१५) खराब, टाकाऊ
१६) गप्पांचे आगार
१८) मुस्कटदाबी
२०) मासा पकडण्याचे साधन
२३) झाडाच्या भोवतीचा कट्टा
२५) सरसकट
२७) बैलाच्या शिंगाना बांधण्याचा दोर
२९) काटकसर
३०) माकडांची टोळी
३१) भ्रम
३४) एक बारीक धान्य
३६) विद्युल्लता
३८) धिंड काढणे
३९) तिखट मीठाचा शिरा
४१) सामान
४२) कळण्यास दुर्बोध असे
४५) रात्रीचा पाऊस
४९) एक ज्वालाग्रही पदार्थ
५०) देवादिकांत भांडणे लावणारा मुनीवर्य
५२) पळून जाणे
५४) चाकरी करणारा
५७) मनाचा ओढा
५८) गवगवा
५९) धैर्य
६१) उत्तम घोडा
५३) गावठी, गावात तयार झालेले, अस्सल
६६) माकडातील एक जात
६८) तोंडाने तोडलेला मोठा तुकडा
७०) सारखा, विषमच्या विरुद्ध

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

